# प्रकरण पहिले

# स्वर्णजयंती ग्राम–स्वरोजगार योजनेचे स्वरूप

(The Nature of Swarna Jayanti Gram Swa Rojgar Yojana)

## १) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची पार्श्वभूमी (Background of SGSY) :

भारत सरकार प्रथमपासूनच गरिबी दूर करण्यासाठी महत्त्व देत आले आहे. गरिबी ही आपल्या देशासमोरील सर्वात मोठी समस्या आहे. ती इतर अनेक समस्यांचे मूळ कारण आहे. म्हणून गरिबीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आलेले आहे. केंद्र शासनाने पूर्वीच्या एकात्मिक ग्रामिण विकास योजनेची पुनर्रचना करून २१ व्या शकताची नांदी म्हणून १ एप्रिल १९९९ पासून "स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना" ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली. स्वयंसहाय्यता बचत गट हा या योजनेचा आत्मा आहे.

भारत देशात अजूनही ग्रामीण भागात २७.१% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली येते. (२००२-२००३ या सर्वेक्षण अहवालानुसार) या लोकसंख्येचा जीवनस्तर वाढविण्यासाठी स्वरोजगारी व बचत गट निर्माण करून त्यांचे आर्थिक व सामाजिक पातळीत सुधारणा करण्यासाठी ही योजना अंमलात आणली. या योजनेद्वारे बचत गटांना अर्थसहाय्य करून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावणे हा मुख्य उद्देश आहे. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना हा एक पतकर्ज व अर्थसहाय्य कार्यक्रम आहे.

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेमध्ये स्वयंसहाय्यता गट या दृष्टीकोनावर मुख्य लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. या गटामध्ये दारिद्र्य रेषेखालील जास्तीत जास्त

लोकांचा समावेश करून (महिलांना जास्तीत जास्त प्राधान्य) व चढत्या क्रमाने वित्त व्यवस्थेचा अधिकांश भाग स्वसहाय्य गटांसाठी उपलब्ध करून कुटुंबांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे हा मूळ उद्देश आहे.

१ एप्रिल १९९९ पासून केंद्र शासनाने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना अंमलात आणली. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबापैकी येत्या ५ वर्षात ३०% कुटुंबाना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे. या योजनेअंतर्गत ज्यांना लाभ मिळणार आहे त्यांना लाभार्थी असे न संबोधिता 'स्वरोजगारी' असे संबोधण्यात येणार आहे. प्रत्येक स्वरोजगारीला तिसऱ्या वर्षापासून दरमहा सरासरी रु. २,०००/- इतके निव्वळ उत्पन्न कायमस्वरूपी मिळणे अपेक्षित आहे.

## २) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेची ठळक वैशिष्ट्ये :

### १) उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून देणे :-

ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना आर्थिक मदतीद्वारे उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून देणे व त्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणणे हा या योजनेचा मूळ हेतू आहे.

### २) स्वरोजगार मिळवून देणे :-

पूर्वीच्या योजनेमध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांना योजनांचा लाभ देणे हे उद्दिष्ट होते. परंतू या योजनेंतर्गत त्यांना केवळ लाभ न देता स्वरोजगार मिळवून देणे हा या योजनेचा गाभा आहे.

### ३) गरीब लोकांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त करून देणे :-

दारिद्रय रेषेखालील लोकांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी दारिद्रय रेषेखालील पात्र स्वरोजगारींना त्यांच्या आवडीचा उद्योग व्यवसाय सुरू करण्यास प्रवृत्त करून बँकाकडून कर्ज व शासनाकडून अनुदान दिले जाते.

### ४) स्थलांतरास पायबंद घालणे :-

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व शेतमजूरी करणे हा आहे. हा व्यवसाय बाराही महिने चालत नाही. पर्यायाने त्यांना मजूरी मिळविण्यासाठी घर, दार, कुटुंब विस्कळीत करून स्थलांतर करावे लागते. पण या योजनेअंतर्गत स्वरोजगारीना त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध झाल्यामुळे स्थलांतर करण्याची गरज भासत नाही.

### ५) शिथील अनुदान मर्यादा :-

या योजनेअंतर्गत सर्वसाधारण दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना वैयक्तीक व्यवसाय करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ३०% परंतू जास्तीत जास्त ७५००/- रूपये एवढे शासकीय अनुदान अनुज्ञेय आहे. अनुसूचित जाती जमाती यांच्या बाबतीत ही मर्यादा प्रकल्प खर्चाच्या ५०% परंतू जास्तीत जास्त १०,०००/- रूपये आहे. शेती सिंचनाचा प्रकल्प असेल तर अनुदानासाठी मर्यादा रहाणार नाही. प्रकल्प खर्चाचे ३०% किंवा ५०% अनुदान मिळेल या योजनेंतर्गत स्वयंसहाय्यता गटास सामूहिक प्रकल्पासाठी प्रकल्प खर्चाच्या ५०% परंतू जास्तीत जास्त १,२५,०००/- इतके अनुदान मिळेल.

### ६) आधारभूत व्यवसायाची निवड :

प्रत्येक तालुक्यातील तेथील साधनसंपत्ती, व्यवसायातील कौशल्य, बाजारपेठेची उपलब्धता यांचा विचार करून प्रत्येक शासकीय विभागाने कोणत्या व्यवसायास सर्वाधिक वाव आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. नाबार्ड, बँका, तांत्रिक व औद्योगिक संस्था इ. नी केलेले सर्वेक्षण त्याचबरोबर स्थानिक खादी व ग्रामोद्योग अधिकारी व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, उद्योगमित्र यांचेही सहाय्य अपेक्षित आहे. इतर स्वयंसेवी संस्था व सामाजिक संस्था यांचा दृष्टीकोन देखील विचारात घेणे आवश्यक आहे.

### ७) प्रकल्प अहवाल :

निवडलेल्या व्यवसायासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याची जबाबदारी स्वयंसेवी संस्था, गट विकास अधिकारी व बँक यांची राहील. सर्व संमतीने केलेल्या व्यवसायाच्या प्रकल्प अहवालास सभेत मान्यता घेऊन त्याप्रमाणे बँक कर्ज उपलब्ध झाल्यास प्रकल्प योग्य पद्धतीने चालविणे गरजेचे आहे.

### ८) स्वरोजगारी व्यवसाय उद्दिष्ट्ये :

एकूण स्वरोजगारींच्या किमान ७५% स्वरोजगारी निवडलेल्या प्रमुख व्यवसायातील असतील. एकूण स्वरोजगारीच्या कमाल २५% स्वरोजगारी निवडलेल्या प्रमुख व्यवसायाव्यतिरिक्त असतील.

### ९) स्वरोजगारी निवड :

या योजनेंतर्गत ५०% स्वरोजगारी अनुसूचित जाती / जमातींचे निवडणेत येतील ४०% महिला स्वरोजगारी असतील. स्वरोजगारींची निवड ग्रामसभेत करण्यात येते.

### १०) दारिद्र्य रेषेखालील स्वरोजगारीला योजनेअंतर्गत लाभ :

स्वरोजगारीना बँकाकडून कर्ज व शासनाकडून अनुदान तसेच आवश्यक ते प्रशिक्षण व मार्गदर्शन पुरवले जाईल. या योजनेंतर्गत व्यक्तीगत लाभ तसेच दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीचे स्वयंसहाय्यता गटात सामिल होऊन गटामार्फत योजनेचा लाभ घेता येईल.

### ११) कर्जाचे स्वरूप :

हे कर्ज मध्यम मुदतीचे (५ वर्षे) असून अनुदान अंतीम तत्त्वावर (बँक अँड सबसिडी) देणेत येईल.

### १२) कर्जाची वसुली :

स्वरोजगारींना बँकेच्या कर्ज फेडीचा हप्ता बँकेकडून ठरवून त्याप्रमाणे वसूली करण्यात येईल. ८०% पेक्षा कमी वसूली असणारी गावे व पंचायत समित्या पुढील लाभासाठी अपात्र ठरविता येतील.

### १३) प्रशिक्षण :

कौशल्य वृद्धीसाठी प्रशिक्षण कालावधी एक आठवड्यापेक्षा जास्त असेल तर त्यासाठी बँकेकडून सॉफ्ट लोनची तरतूद आहे.

### १४) तंत्रज्ञान :

प्रमुख व्यवसायासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान या योजनेंतर्गत तांत्रिक संस्थांची मदत घेऊन उपलब्ध करून देण्यात येईल.

### १५) बाजारपेठ :

स्वरोजगारीच्या वस्तूंसाठी बाजारपेठ उपलब्धतेसाठी व्यावसायिक अनुभव, स्थानिक बाजारपेठ सर्वेक्षण, अनुभव प्राप्त संस्था, संस्थांशी समन्वय, मेळावे इ. वर भर दिला आहे. यामध्ये विविध वित्तिय संस्था, महामंडळे यांची जबाबदारी अधिक आहे.

### १६) मुलभूत सुविधा :

निवडलेल्या प्रमुख व्यवसायासाठी महत्त्वाच्या आवश्यक मुलभूत सुविधांच्या अभावांचा (क्रिटीकल गॅप) शोध घेऊन संबंधीत संलग्न विभागाने कार्यवाही करावयाची आहे. त्यांच्याकडून पूर्तता होत नसल्यास या योजनेअंतर्गत अशा मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधी खर्च करण्यात येईल.

### १७) बँकामध्ये एस. जी. एस. वाय. कक्षाची स्थापना :

बँकांनी त्यांच्या क्षेत्रीय / प्रादेशिक कार्यालये यासारख्या नियंत्रण कार्यालयामध्ये एस.जी.एस. वाय. कक्ष उभारावेत.

## ३) स्वयंसहाय्यता गटांची गरज व वैशिष्ट्ये :

दारिद्र्य निर्मूलनाची प्रक्रिया ही उत्स्फूर्त प्रक्रिया नसल्याने, तिला प्रवृत्त करावे लागेल. जिल्हा ग्राम विकास अधिकरणाने, स्वसहाय्य बचत गट तयार करून, त्यांचा विकास करून,त्यांना बळकट करून, गरीबी निर्मूलनासाठी समाज जागृतीची प्रक्रिया सुरू करणे व ती कायम ठेवणे अपेक्षित आहे.

ग्रामीण भागातील समान आर्थिक व सामाजिक स्तरातील तसेच ज्यांचे आचार-विचार समान आहेत, ज्यांची परसर जवळीक आहे अशा लोकांचे लहान-लहान गट स्थापन करून गटाच्या निर्णयानुसार गटातील सभासदाकडून दरमहा नियमित ठराविक रक्कम जमा करून त्या निधीतून गटातील सभासदांच्या आर्थिक अडचणी भागविणारा गट म्हणजे स्वयंसहाय्यता समूह होय.

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या, गरिबांना संघटित करण्याच्या दृष्टीकोणामागे गरिबांकडे असलेल्या स्वत:ला मदत करण्याच्या मोठ्या गुणांचा उपयोग करून घेणे ही धारणा आहे. त्यांना संघटित करून या गुणांचा उपयोग करून घेता येईल. समाज जागृतीमुळे गरीबांना त्यांची स्वत:ची संघटना तयार करणे शक्य होते. त्यामुळे गरिबी निर्मूलना संबंधीच्या सर्व प्रश्नावर निर्णय घेण्यामध्ये त्यांचा संपूर्ण व थेट सहभाग असतो. त्याचप्रमाणे स्वसहाय्य गटांना उधारी बाबतीत किंवा तंत्रज्ञान किंवा बाजाराबाबतचे मार्गदर्शन या स्वरूपात मिळणाऱ्या सहाय्याचा फायदा स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेखालील गरीब लोकांकडे त्वरेने आणि अधिक कार्यक्षमरित्या पोहचण्यास मदत होते. या गटामध्ये ग्रामीण भागातील स्वरोजगारी स्वत:ची ठरविलेली रक्कम घेऊन एकत्र बसून स्वत:ची बचत एकत्र करतात. गरजू सभासद स्वरोजगारी आवश्यक अशा आर्थिक सहाय्याची गटाकडे मागणी करतात. याबाबत सामूहिक निर्णय घेतले जातात. या आर्थिक सहाय्याची परतफेड नियमितपणे करतात. याशिवाय सुखदु:खाच्या प्रश्नावर चर्चा, गप्पा होतात. संपूर्ण बचत गटासाठी प्रकल्प तयार करून त्याद्वारे स्वरोजगारीचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केला जातो.

## ४) गट तयार करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे :

१) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेखाली लहान पाटबंधाऱ्यांच्या बाबतीत एका स्वसहाय्य गटामध्ये १० ते २० व्यक्तींचा अंतर्भाव होईल आणि विकलांगांच्या बाबतीत ही संख्या किमान ५ असेल.

२) गटातील सर्व सभासद हे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील असावेत. या गटामध्ये एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींचा अंतर्भाव नसावा. एक व्यक्ती एकापेक्षा अधिक गटाचा सदस्य होणार नाही.

३) या गटाला स्वत: बंधन घालून घेण्यासाठी (गट व्यवस्थापन प्रमाणक) आचारसंहिता असावी. मोकळेपणाने विचारांची देवाणघेवाण करण्याचा दृष्टीकोन ठेऊन, लोकशाही पद्धतीने कार्य करून निर्णय घेण्याकरिता, एकत्रित बसून त्यावर विचारविनिमय करण्यासाठी नियमित सभा आठवड्यातून किंवा पंधरवड्यातून असावी.

४) नियमित बचतीचा हप्ता, कालावधी, कर्ज कोणत्या कालावधीसाठी घ्यावयाचे, व्याजाचा दर हे गटातील सभासदांच्या मते ठरविले जाईल.

५) गटामार्फत दैनंदिन गरजा, आर्थिक अडीअडचणी सोडविणे, आजारपण यांसाठी कर्ज दिले जाते. नियमितपणे सदस्यांकडून किमान ऐच्छिक बचतीची रक्कम वसूल करण्यास गट सक्षम असावेत. ही बचतीची रक्कम गटाचा मुख्य आधार असतो.

६) कर्जासाठीच्या अर्जांना प्राधान्य देणे, परतफेड करण्याचा कालावधी ठरवून देणे, आगाऊ कर्जाकरिता व्याजाचा दर निश्चित करणे, कर्जाच्या परतफेडीच्या हप्त्यावर बारकाईने नियंत्रण ठेवले पाहिजे.

७) गटांनी त्यांच्या सदस्यांना कर्जाचे वाटप केल्यानंतर सदस्यांकडून काही रक्कम गुंतवणूक म्हणून गटाकडे जमा करण्यासाठी गटाने एक गटखाते सुरू केले पाहिजे.

८) गटाने कार्यवृत्त पुस्तक, हजेरी पुस्तक, कर्जखाते वही, सर्वसाधारण खाते वही, रोकड वही, बँक खाते पुस्तक व व्यक्तीगत खाते पुस्तक यांसारखे अभिलेख ठेवले पाहिजेत.

९) ५० टक्के गट हे केवळ महिलांकरिता असावेत. जिथे योग्य असेल तेथे विशिष्ट विकलांग व्यक्तीकरिता विशेषकरून गट स्थापित केले पाहिजेत, तथापि विशिष्ठ, विकलांगता असणाऱ्या लोकांची पुरेशी संख्या उपलब्ध न झाल्यास अन्य विकलांग व्यक्तींचा समावेश करून घेण्यात येईल.

१०) स्थूलमानाने स्वसहाय्य गट हे अनौपचारिक असतील तथापि, हे गट स्वत:हून संस्था नोंदणी अधिनियम राज्य सहकारी अधिनियमाखाली स्वत: नोंदणी करू शकतील किंवा भागीदारी संस्था म्हणून नोंदणी करून होऊ शकतील. स्वसहाय्य गट गाव पातळीवर संघटित होऊन सक्षम व स्थैर्य प्राप्त करू शकतो. त्यामुळे जिल्हा ग्राम अभिकरण व इतर विभागाकडून मिळणाऱ्या माहितीद्वारे नियमित सुसंवाद साधणे व देवाण-घेवाण करणे सुलभ जाईल.

### ५) अशासकीय संघटनांची भूमिका :

गट तयार करणे व त्यांचा विकास करणे ही उत्स्फूर्त प्रक्रिया नाही असा देशभरातील अनुभव आहे. बाहेरून काम करणाऱ्या समाजसेवी संघटना ह्या समाजातील तळागाळातील लोकांबरोबर काम करतात. त्या गट स्थापण्याच्या त्यांच्या विकास कामात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात ही समाजसेवी संघटना शासकीय व अशासकीय असू शकते. शासनाच्या कार्यात त्राहून घेतलेल्या या सर्व सेवाभावी संस्थांना जिल्हा ग्राम विकास अभिकरण मदत देऊ शकते.

### ६) बँकांशी दुवा जोडणे :

गट तयार करण्याच्या टप्प्यामध्ये स्वसहाय्य गटाने स्थानिक बँकांशी संबंध साधला पाहिजे. हे काम तिसऱ्या किंवा चौथ्या महिन्यात सुरू होईल आणि त्यात दुहेरी उद्देश असेल.

स्वसहाय्य गटांना बँकाकडून मिळणाऱ्या संधीविषयी तसेच बँकांशी कशाप्रकारे व्यवहार करावा याची देखील जाणीव होते. तसेच बँक व्यवसायी स्वत:च स्वसहाय्य गटाशी परिचय करून घेतील. गट विकास अधिकारी व बँक व्यवसायी शक्य होईल तितक्या जास्तीत जास्त वेळा स्वसहाय्य गटांना भेटी देतील आणि स्वरोजगारासाठी असलेल्या संधीविषयी सदस्यांना समजावून सांगतील.

### ७) स्वयंसहाय्यता गटासंबंधीचे नियम :

'जो दुसऱ्यावर विसंबला, त्याचा कार्यभाग बुडाला' - हे स्वयंसहाय्यता बचत गटाचे आधारभूत तत्त्व आहे.

आजपर्यंत दारिद्र्य रेषेखालील लोकांना शासनाच्या अनुदानावर अवलंबून रहावे लागत होते. या योज्नेत कमीत कमी दररोज १ रूपया जमा करावयाचा, महिन्याचे ३० रूपये जमा झाले की बँकेत भरावयाचे. बँकेत खाते उघडण्याची संधी या योजनेतून लोकांना मिळाली आहे. स्तव:च स्वत:ची मदत करावयाची आहे.

**१) कोणाचा गट स्थापन करता येतो ?**

केवळ पुरूषांचा किंवा केवळ स्त्रियांचा किंवा पुरूष व स्त्रियांचा मिश्रगट स्थापन करू शकतो.

**२) स्वयंसहायता प्रवृत्त कसा करावा?**

- ❑ कोणत्या विभागात / परिसरात काय करायचे त्याची भौगोलिक सामाजिक, आर्थिक माहिती समजावून घेणे आवश्यक आहे. त्या भागातील प्रमुख संस्था विकास अधिकाऱ्यांना भेटून स्वरोजगारासंबंधी चालू असणाऱ्या उपक्रमांची माहिती घेणे आवश्यक आहे.
- ❑ भाग निश्चित झाल्यानंतर इच्छुक गावांची माहिती घेऊन इच्छुक स्वरोजगारीची माहिती घेणे व अशा कार्यकर्त्यांच्या सहकार्याने गावाचे सर्वेक्षण करणे. स्वरोजगारी व्यक्तींशी संपर्क वाढविणे. बचत गटाचे महत्त्व सांगणे सभेस येण्यास प्रवृत्त करणे.

**३) स्वयंसहाय्यता गट स्थापन करताना सभसदांच्याबाबत पाळावयाचे नियम :**

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील एकाच व्यक्तीला गटात प्रवेश मिळेल. त्या कुटुंबातील अन्य व्यक्ती किंवा सदस्य कोणत्याही बँकेची थकबाकीदार नसावी. गटातील

सदस्य संस्था कमीत कमी दहा व जास्तीत जास्त २० असावी. गटातील सदस्य हा बचत करणारा तसेच गटातून कर्ज उचलणारा असावा. सर्व सदस्यांची बचतीची रक्कम सारखीच असावी. गटातील सदस्य हा सर्व कर्जाची परतफेड करणारा व निर्व्यसनी असावा. तसेच काटकसरीही असावा. सर्वांना घेऊन चालणारा समजूतदार असावा. जात, धर्म, वर्ण याचा विचार न करता गटात प्रवेश देण्यात यावा, स्वरोजगारी तेथे स्थानिक असावा. सभासद नोंदणी फी म्हणून दोन रूपये एकदाच घेण्यात यावे.

## ४) स्वयंसहाय्यता गटाची पहिली सभा व गटासाठी नियम ठरविणे

आपल्या गटात योग्य सदस्यांची निवड झाल्यावर गट स्थापन करण्यासाठी गटाची पहिली सभा बोलवावी. बुकात उपस्थित सभासदांच्या सह्या घ्याव्यात. त्यानंतर संघटन कौशल्य असणारा, वेळेचे बंधन पाळनारा व सर्वांच्या अडी-अडचणी लक्षात घेणारा असावा त्यानंतर सचिवांची निवड म्हणजेच खजिनदार. 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' असा सचिव नसावा. सचिव म्हणजे गटाच्या पाठीचा कणा तो कणखर असावा. त्यानंतर त्या गटातील सर्व सदस्यांना रूचेल, पटेल असे गटाला नाव द्यावे. कुणाच्याही राजकीय, सामाजिक भावना दुखवल्या जाणार नाहीत, कुठलाही जातीवाचक उल्लेख होणार नाही. उदा. उत्कर्ष, साफल्य, प्रगती, एकता, स्वयंसिद्धा... वगैरे अशा स्वरूपाची नावे गटांना द्यावीत.

प्रत्येक महिन्यात सर्वांनी ठरलेल्या वेळी बचतीची रक्कम दिली पाहिजे. सर्वांच्या समोर बचत एकत्र करून आर्थिक सहाय्य केले जाईल. सभासदाने दोन सभासदापेक्षा जास्त सभासदांना जामीन राहू नये. आर्थिक सहाय्य द्यावयाचा निर्णय गटाच्या मासिक सभेत

घेणेत येईल. गटाच्या सामूहिक गरजा लक्षात घेऊन असलेल्या उत्पन्नाची वाटणी करण्यात यावी. जे सभासद सर्व सहाय्य एकाच हप्त्यात परतफेड करतात त्यांना लगेच दुसऱ्यांदा आर्थिक सहाय्य देऊ नये. आर्थिक सहाय्याची वसूली न झाल्यास दंड हा घेतलाच पाहिजे. वसूलीला जामिनदार जबाबदार धरला जाईल. जे सभासद बचत / सहाय्य परतफेड लागोपाठ तीन वेळा करत नसल्यास त्यांना वर्षभर पुन्हा सहाय्य मिळणार नाही, पदाधिकारी घेता येणार नाही. नवीन सभासदाला काही महिने बचत केल्यावरच आर्थिक सहाय्य घेता येईल. घेतलेल्या सहाय्याचा दुरूपयोग केला तर त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.

### ५) स्वयंसहाय्यता गटाची बचत व कर्ज विषयक सूत्रे :

ग्रामीण भागातील लोकांची सावकाराच्या पाशातून सुटका होण्यासाठी स्वयंसहाय्यता गट सुरळीत चालवण्यासाठी नियमित बचत करणे गरजेचे आहे. तसेच बचतीच्या पैशातून कर्जे देऊन ती वसूल करणे गरजेचे आहे. बचत गट स्वावलंबी करणे ही आवश्यक बाब आहे हे सूत्र समजावून सांगून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे स्वयंपूर्ण करणे गरजेचे आहे. कारण बचतीपासून मोठे भांडवल तयार होते. सर्वांनी संघटीत होऊन काम केल्यामुळे स्वरोजगारींना शक्तीची जाणीव होते.

प्रत्येक सदस्याने मिटींगला येताना आपल्या जवळचे पासबुकावर जमा केलेली रक्कम नोंद करावी. ही रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जमा करावी.

### ६) स्वयंसहाय्यता गटासाठी हिशोब पद्धती व दप्तरी नोंद :

१) हजेरी पुस्तक - सभासदांच्या (हजर असलेल्या) सह्या

२) टिपण वही - म्हणजेच इतिवृत्त पुस्तक. या टिपण वहीत प्रत्येक गटाचा विकास कसा झाला हे याचा आढावा घेणे सुलभ होते. टिपण वहीमध्ये मिटींगची तारीख, उपस्थित सभासदांची संख्या, मागील मिटिंगला घेतलेल्या निर्णयाचा आढावा, जमा झालेली रक्कम, एकूण कर्ज, नविन कर्ज, जमा झालेले व्याज, जमा दंड इ.

३) सभासद खातेवही - प्रत्येक मिटींगवेळी बचतीचा / कर्ज परतफेडीच्या रकमेची नोंद खातेवहीमध्ये करून ही वही सचिवाकडे राहील.

४) सभासद पासबुक - प्रत्येक सभासदाला एक पासबुक देण्यात यावे. यामध्ये रकमेची नोंद करून त्यामध्ये सभासदाची सही घ्यावी.

५) रोजकीर्द - गटाच्या दैनंदिन आर्थिक व्यवहाराच्या नोंदी यामध्ये ठेवाव्यात.

नोंद ठेवल्यामुळे प्रत्येक सभासदाला वक्तशीरपणा व नियमितपणा तसेच परतफेड ही पण नियमित ठेवण्याची कल्पना येते व सवय लागते. सभासदाला आपले पैसे सुरक्षित आहेत याची खात्री पटते. नोंद ठेवण्याच्या स्वत:च्या जबाबदारीची जाणीव होते. एखाद्या ठराविक संस्थेप्रमाणे काम करणे व टिपण ठेवणे याची जाणीव होते.

## ७) स्वयंसहाय्यत्ता गटांना स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत लाभ : (प्रतवारी तपासणी)

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबानी एकत्र येऊन स्वयंसहाय्यता गट स्थापन करून तो ६ महिने कालावधीपर्यंत चालविलेनंतर त्या गटाची पहिली प्रतवारी तपासणी करणेत येईल. ही प्रतवारी तपासणी १०० गुणांची असेल. गटविकास अधिकारी किंवा त्याचे प्रतिनिधी, संबंधित बँक शाखेचे शाखा व्यवस्थापक आणि स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी हे या समितीचे

सदस्य असतील. समितीचे हे सदस्य स्वयंसहाय्यता गटास संयुक्तपणे भेट देऊन गटाची पहिली प्रतवारी तपासणी करतील. जे गट सहा महिन्यांच्या पहिल्या टप्प्यामध्ये टिकून रहातात अशा गटांचा दुसऱ्या टप्प्यात समावेश होतो. या प्रतवारी तपासणीत गटास १०० पैकी ७५ गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास गट योजनेअंतर्गत रूपये २५०००/- इतके खेळते भांडवल मिळणेस पात्र ठरेल. यापैकी १०,०००/- पर्यंत अनुदान स्वरूपात व बँकेकडून रु. १५०००/- कर्जरूपाने. अनुदानावर कोणतेही व्याज आकारले जात नाही. यासाठी गटविकास अधिकारी यांचेमार्फत संबंधित बँक शाखा व्यवस्थापकाकडे विहित नमुन्यात अर्ज करता येईल. गटविकास अधिकारी हा अर्ज शिफारस करून संबंधित बँक शाखा व्यवस्थापकाकडे पाठवतील व बँक शाखा व्यवस्थापक योजनेअंतर्गत गटास कॅश क्रेडीट खात्याच्या स्वरूपात रू. २५०००/- इतके खेळते भांडवल मंजूर करतील व त्यानंतर गटास या कॅशक्रेडीट खात्यामधून आवश्यक तेवढी रक्कम काढता येईल. ही रक्कम गटातील सदस्यांना त्यांचे उत्पन्नात वाढ होईल अशा बाबीसाठी कर्ज देण्यासाठी वापरावयाची आहे. त्याशिवाय पुढे करावयाच्या व्यवसायासाठी मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच इतर आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी या रकमेतून कर्ज देता येईल. या खेळत्या भांडवलातून सभासदांना कर्जे देऊन त्याची नियमित वसुली करावयाची आहे. या कर्जावर गटाने ठरविलेल्या दराने व्याज आकारणी करावयाची आहे. गटाने कॅशक्रेडीट खात्यातून काढलेल्या रकमेपैकी १०००/- पर्यंतच्या रकमेवर बँक व्याज आकारणार नाही मात्र १०००/- पेक्षा जास्त रकमेवर व्याज आकारले जाईल. गटाने दर तीन महिन्यांनी व्याजाची रक्कम बँकेकडे जमा करावी. सभासदाकडून दरमहा कर्जवसुली करावी. यातून

गटाकडे जमा झालेला रकमेतून राहिलेल्या सभासदाना कर्ज द्यावे व गरज नसल्यास जमा झालेली रक्कम गटाच्या बँक कॅश-क्रेडीट खात्यात पुन्हा जमा करावी. कॅशक्रेडीट खात्याची मुदत एक वर्षाची असते. मुदतीनंतर कॅशक्रेडीट खात्याचे नूतनीकरण करून घ्यावे.

## ८) स्वयंसहाय्यता गटास व्यवसायासाठी कर्ज (दुसरी प्रतवारी तपासणी)

गटास खेळते भांडवल देऊन सहा महिने कालावधी पूर्ण झाल्यानंतर गटाची दुसरी प्रतवारी तपासणी करणेत येईल. ही प्रतवारी तपासणी २०० गुणांची असेल. या प्रतवारी तपासणीत गटास २०० पैकी १५० गुण किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास गट स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत व्यवसायासाठी कर्ज मिळण्यास पात्र ठरेल. त्यानंतर गटाने संबंधित खात्याच्या सहकार्याने प्रकल्प अहवाल तयार करून व गटाच्या सभेत ठराव करून ग. वि. अ. यांचेमार्फत संबंधित बँक शाखा व्यवस्थापकाकडे अर्ज करावा. गटाला सामूहिकरित्या व्यवसाय करण्यासाठी समूह कर्जासाठी अर्ज करता येईल किंवा गटातील स्वरोजगारीना गटामार्फत व्यक्तीगत व्यवसायासाठी अर्ज करता येईल. या दोन्ही बाबतीत गटाने बँकेला कर्ज फेडीची हमी देणे आवश्यक आहे व तसा ठराव गटाने संमत करणे आवश्यक आहे. ग.वि.अ. यांनी ही कर्ज मागणी अर्ज संबंधित बँक शाखा व्यवस्थापकाकडे पाठवावेत. बँक शाखा अधिकारी यांचेकडे हे अर्ज प्राप्त झालेवर शक्यतो १५ दिवसात ते अर्ज मंजूरीबाबत निर्णय घेतील.

बँकेने कर्ज मंजूर केल्यावर गटातील सर्व सभासदांना ग.वि.अ. यांचेमार्फत पायाभूत प्रशिक्षण देणेत येईल. हे प्रशिक्षण एक किंवा दोन दिवसाचे असेल. जर प्रकल्पासाठी

आवश्यक किमान कौशल्य सदर सभासद स्वरोजगारीजवळ नसेल तर त्यांना किमान कौशल्याचे आवश्यक ते प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले जाईल व ते प्रशिक्षण पूर्ण झालेनंतर बँक व्यवसायासाठी कर्जपुरवठा करील गट दुसऱ्या प्रतवारी तपासणीत पात्र झालेशिवाय त्याला कर्जपुरवठा होणार नाही.

## ९) व्यक्तीगत स्वरोजगार करणारी व्यक्ती निश्चित करणे व निवडणे :

प्रत्येक वर्षी स्वर्णजयंती स्वरोजगार योजना गट समितीने गावांची यादी निश्चित केल्यावर संबंधित सरपंचांना ती कळवण्यात येईल. व्यक्तिगत स्वरोजगार करणाऱ्या व्यक्तींची निवड ग्रामसभेत करावयाची असते. पंचायतीच्या मुख्यालयात ग्रामसभा भरविणे शक्य आहे. परंतु या ठिकाणी सर्वच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना भाग घेणे शक्य नाही म्हणून गरीब लोकांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेण्याकरिता गटविकास अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी, बँक व सरपंच या तीन सदस्यांचा मिळून एक गट मिळविला जाईल. आणि हा गट या प्रयोजनासाठी आखण्यात आलेल्या अनुसूचीनुसार यादी बनवेल व ती यथोचितरित्या प्रकाशित करेल. पंचायतीतील प्रत्येक वस्त्यांना भेटी देऊन दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) कुटुंबातून ज्या व्यक्तींचा समावेश आधारभूत कार्यक्रमांतर्गत करता येईल अशांची सुनिश्चिती हा गट करेल.

स्वरोजगाराची निवड खुल्या व पारदर्शक रीतीनेच केली जावी. गरीब लोक हे आवश्यक शर्तीची पूर्तता करतील. बँक / गट विकास अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कार्यक्रमापेक्षा संभाव्य स्वरोजगारींची संख्या मोठी असेल. याबाबत वस्तूस्थिती माहित होऊ शकेल व अंतीम टप्प्यासाठी संभाव्य उद्योजकांमधील चांगल्या उद्योजकांचा

विचार करणे शक्य होईल. फक्त गरिबांतील गरीब लोक हे स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे लक्ष्य नसून (बीपीएल) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबामधून संबंधित गरीब जे अन्य लाभ मिळण्यास पात्र आहे त्या लोकांना सामावून घेण्यासाठी समिती प्रयत्न करील. समितीची खात्री झाल्यास समिती अधिक सदस्यांची निवड करील व बँकेला अंतिम निवड करण्याची मुभा राहील.

निवड झाल्यानंतर गटविकास अधिकारी निवड झालेल्या व्यक्तींकडून अर्ज भरून घेण्याची व्यवस्था करतील. जिल्हा ग्रामविकास अभिकरण या बाबीमध्ये लक्ष घालेल आणि तसेच दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कुटुंबांना कर्जमंजूरीच्या प्रक्रिया व प्रपत्र यांचा परिचय करून देण्यास उपाय योजील. यामूळे गरिब लोकांच्या मनात या प्रक्रीयेविषयी भीती उरणार नाही.

बँकेला अर्ज प्राप्त झाल्यावर बँक साधारणत: पंधरा दिवसात व कसेही करून एक महिन्याच्या आत तो अर्ज मंजूर करील. बँकेकडून मंजूरीची प्रक्रिया प्रत्येक वर्षी साधारणत: जुलैमध्ये होईल.

निवडलेल्या स्वरोजगारांची अंतिम यादी (वर्षाकरिता) गट विकास अधिकारी मुद्रित करून घेईल व या यादीच्या प्रती पुढील ग्रामपंचायतीसमोर ठेवण्यासाठी ग्राम पंचायतीकडे उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच सदर यादी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण गटविकास अधिकारी बँकेचे अधिकारी व इतर संबंधित संघटनांना देण्यात येतील.

## १०) संदर्भ :


१) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर द्वारा, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांची संकल्पना (पुस्तिका), पान. नं. २-२२.

२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जणसंधारण विभाग मुंबई द्वारा, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना मार्गदर्शक तत्त्वे (पुस्तिका) पान. नं. ५-१८

३) ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एसजीएसवाई) बँको व जिला ग्रामीण विकास राजेंसियों के अधिकारियों हेंतु प्रशिक्षण मार्गदर्शिका, पान. नं. ३३-४१